# अधिसूचना

महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुख्य इमारत ५ १/२ वा मजला,
कुपरेज टेलिफोन निगम इमारत,
महर्षि कर्वे मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दि. १६ डिसेंबर, २०१६.

क्रमांक S — ९/पाच :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, याद्वारे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ पात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि व्दितीय अपील प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे.

**परिशिष्ट**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाखाली पुरविण्यात येणा-या सेवांचे विवरण

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशील | आवश्यक दस्ताऐवजाची पूर्तता झाल्यानंतर लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा (दिवस) | ज्यांच्यामार्फत सेवा पुरविली जाईल, असे पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | व्दितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | उमेदवारांना प्रोफाईलमध्ये प्रवेशप्रमाणपत्रे उपलब्ध करुन देणे | संबंधित परीक्षेच्या ०७ दिवस अगोदर | कक्ष अधिकारी | अवर सचिव | उप सचिव |
| २ | स्पर्धा परीक्षांचे वार्षिक अंदाजित वेळापत्रक जाहीर करणे | प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबर पूर्वी | कक्ष अधिकारी | अवर सचिव | उप सचिव |
| ३ | स्पर्धा परीक्षेच्या वेळापत्रकाची सद्य:स्थिती जाहीर करणे | प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत | कक्ष अधिकारी | अवर सचिव | उप सचिव |
| ४ | पदे विज्ञापित करणे | परिपूर्ण मागणीपत्र प्राप्त होऊन आयोगास आवश्यक सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतर ३० दिवसांत | कक्ष अधिकारी | अवर सचिव | उप सचिव |
| ५ | शासनास शिफारस पत्रे पाठविणे | शिफारशीची पदसंख्या ५० पर्यंत असल्यास : निकालानंतर १५ दिवस ; पदसंख्या ५१-१०० दरम्यान असल्यास ; निकालानंतर २० दिवस; व पदसंख्या १०० पेक्षा जास्त असल्यास : निकालानंतर ३० दिवस | कक्ष अधिकारी | अवर सचिव | उप सचिव |

**टिप** - १) ज्या कार्यासनात कार्यासन प्रमुख अवर सचिव असेल त्या ठिकाणी पदनिर्देशित अधिकारी : अवर सचिव; प्रथम अपिलीय अधिकारी: उपसचिव ; व द्वितीय अपिलीय अधिकारी : सहसचिव/सचिव राहतील.

२) वरील कालमर्यादांकरीता नमूद दिवस, म्हणजे कार्यालयीन कामाचे दिवस (सुट्टया वगळून)

३) न्यायालयीन प्रकरणी कालमर्यादा लागू राहणार नाही.

प्रदीप कुमार
सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग